Impact Factor-7.675 (SJIF)

ISSN-2278-9308

# B.Aadhar

## Peer-Reviewed & Refreed Indexed

## Multidisciplinary International Research Journal

### Mahatma Jyotiba Phule & Dr. Babasaheb Ambedkar..

SPECIAL ISSUE-CCLXXX - B (280)

April-2021



Chief Editor
**Prof. Virag S. Gawande**
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Editor:
**Dr.Sudhir B.Gaikwad,**
Associate professor
Jalna College of Social work
Jalna, Maharashtra

Executive-Editor
**Dr.Sheshrao M.Naikwade**
Associate professor
Nagnath Arts, Commerce
& Science College,
Aundha Nagnath. Dist.Hingoli,

This Journal is indexed in :

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

Impact Factor – 7.675 ISSN – 2278-9308

# B.Aadhar

## Peer-Reviewed & Refreed Indexed

## Multidisciplinary International Research Journal

**April -2021**

ISSUE No- 280 (CCLXXX) B

### महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव विशेषांक

**Prof. Virag S.Gawande**
Chief Editor
Director
Aadhar Social Research & Development Training Institute, Amravati

**Dr.Sudhir B.Gaikwad,**
**Editor**
M.A(Sociology),NET,SET,Ph.D.,MSW,NET,Ph.D.(Ongoing)
Associate professor
Jalna College of Social work Jalna, Maharashtra

**Dr.Sheshrao M.Naikwade**
**Executive – Editor**
M.A.M.Phil.,Ph.D.,NET
Associate professor
Nagnath Arts, Commerce & Science College, Aundha Nagnath Dist.Hingoli.

**Aadhar International Publication**

For Details Visit To : www.aadharsocial.com

© All rights reserved with the authors & publisher

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal | ISSN : 2278-9308
Impact Factor - ( SJIF) -7.675, Issue NO, 280 (CCLXXX) B | April, 2021

# INDEX


| No. | Title of the Paper | Authors' Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | महात्मा जोतीराव फुले : एक क्रांतिशील समाजचिंतक | प्रा. डॉ. मानवेल राकल | 1 |
| 2 | महात्मा फुलेंचे प्राथमिक शिक्षणाबद्दलचे विचार व आजची वस्तुस्थिती | डॉ. प्रज्ञा नागेश लामतुरे | 4 |
| 3 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि पत्रकारिता : एक दृष्टिक्षेप | प्रा.डॉ.श्यामसुंदर पंढरीनाथ वाघमारे | 9 |
| 4 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा उदारमतवाद | डॉ.दत्ता कुंचेलवाड | 14 |
| 5 | भारत में जातिव्यवस्था,वंचित वर्ग के संवैधानिक संरक्षणों और निजीकरण का समाज पर प्रभाव | सुरेश प्रसाद अहिरवार | 19 |
| 6 | महात्मा फुले, डॉ.आंबेडकर:एक अनुबंध | प्रा.डॉ.सतीश मस्के | 24 |
| 7 | परिवर्तनशील कवी महात्मा फुले | प्रा.डॉ. शेषराव नाईकवाडे | 29 |
| 8 | 'शेतकऱ्यांचा आसूड' मधील म.फुले यांचे शेतीविषयक विचार | प्रा.डॉ.अरिमा चिश्ती | 31 |
| 9 | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा साहित्यविषयक दृष्टीकोन | प्रा.डॉ. संतोष हंकारे | 36 |
| 10 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि धम्मक्रांती | डॉ.सुधीर व.गायकवाड | 40 |
| 11 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे हिंदू कोड बिलाबाबत विचार | प्रा.डॉ.दिलीप जानकीराम भोगडे | 46 |
| 12 | महात्मा ज्योतिबा फुले आणि त्यांचे शैक्षणिक विचार | डॉ. प्रविण मानसिंग कांबळे | 51 |
| 13 | महात्मा फुले आणि सत्यशोधक समाज | प्रा.डॉ.आचार्य आर.डी. | 58 |
| 14 | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक विचार | डॉ. व्ही. बी. भांडजकर | 60 |
| 15 | 'हिंदू कोड बिल आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर' | प्रा.डॉ. योगेश के. शेंडे | 62 |
| 16 | स्त्री मुक्तीचे जनक : भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर | प्रा.डॉ.संजीव राजाराम कहाळे | 65 |
| 17 | सामाजिक परिवर्तनाच्या संदर्भात डॉ.आंबेडकरांचा दृष्टिकोन | डॉ.पुरुषोत्तम भगवंता भवरे | 68 |
| 18 | भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्री विषयक विचार | प्रा.डॉ. शिंदे डी.पी. | 74 |
| 19 | महात्मा ज्योतिबा फुले आणि स्त्री विषयक विचार | महेश मुरलीधर मुंडे | 77 |

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ( (SJIF) –7.675, Issue NO, 280 (CCLXXX) B
ISSN : 2278-9308 April, 2021

# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक विचार

डॉ. व्ही. बी. चांदजकर
राज्यशास्त्र विभाग प्रमुख एम. एस. गोटे महाविद्यालय, वाशिम जि. वाशिम
मो.९७६४२९४८८८

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जगातील सामाजिक शास्त्राचा जसे अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, मानवंशशास्त्र, धर्मशास्त्र, नीतीशास्त्र, शिक्षणशास्त्र, इतिहासशास्त्र आणि कायदाशास्त्र यांचा सखोल अभ्यास केला. त्याच बरोबर जगातील युध्द, लढाया आणि विविध क्रांत्यांचा अभ्यास केला. तसेच वंशवादाचा आणि जागतिकस्तरावर असलेल्या गुलामांचा अभ्यास केला.

डॉ. आंबेडकरांच्या वाचनात, चिंतनात व लेखणात ताकद, शक्ती होती. ज्ञानसंपन्नतेच्या शक्तीमुळेच व्यक्ति, समाज, राज्य आणि राष्ट्र महान बनत असते. याची त्यांना पुरेपूर जाणिव झाली होती. त्यामुळे १८ – १८ तास अभ्यास करुन शेकडो वर्षांचा शिल्लक राहिलेला ज्ञानांचा बॅकलॉग बाबासाहेबांनी भरुन काढण्याचा प्रयत्न केला.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी तळागाळातील सर्व सामान्य माणूस सर्वशक्तीनिशी जागा केला. त्याला आत्मसन्मान,स्वाभिमान,आस्मिता व सामर्थ्याची जाणीव करुन दिली मानसिक गुलामगिरीतून मुक्त केले. हक्काने जगण्याचे शिकविले.त्यासाठी संघर्षाचे सत्याग्रह करुन समता व न्याय समाजात निर्मान केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी म्हणजे भारताच्या नव्या उभारणीचे एक महान वैभव बनले होते.

**लोकशाही आणि राज्यघटना :**

जगातील आदर्श समाज निर्माण करण्यासाठी त्यांनी लोकशाही शासनाचा स्विकार केला. त्यासाठी एक व्यक्ती आणि एकमत एक मूल्य आणि त्याची एकच किंमत हा सिध्दांत दिला ही राजकीय लोकशाही असली तरी ही त्याचे रूपांतर सामाजीक आणि आर्थिक लोकशाही मध्ये व्हावे. असे त्यांना वाटत होत. तर जगापुढे हा देश टिकेल. अन्यथा अडचणीत येईल. यासाठी त्यांनी जगाला शोभेल आणि भारताला आधुनिक काळात सर्व प्रकारच्या सुधारणा व सर्वांगीण विकास करता येईल अशी या देशाला राज्यघटना दिली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कोलंबिया विद्यापीठ आणि लंडन स्कुल ऑफ इकॉनॉमिक्स या शिक्षण संस्था मधून अर्थशास्त्र विषयात विद्यावाचस्पती पदव्या मिळवल्या. सुरूवातीच्या कारकिर्दीत ते एक अर्थशास्त्राचे प्राध्यापक आणि वकिल होत. त्यांनतर त्यांनी सामाजीक व राजकीय क्षेत्रात काम केले. ते भारताच्या स्वातंत्र्या साठी प्रचार व चर्चा मध्ये सामील झाले. वृत्तपत्रे प्रकाशित केले. दलीतासाठी राजकीय हक्काचा व सामाजिक स्वातंत्र्याचा पुरस्कार केला तसेच आधुनिक भारताच्या निर्मितीत महत्वपूर्ण योगदान दिले.

इ.स. १९५६ मध्ये त्यांनी आपल्या अनूयायांसह बौध्द धर्म स्विकारला. इ.स. २०१२ मध्ये ' द ग्रेटेस्ट इंडियन' सर्वेक्षणात आंबेडकराचे सर्वश्रेष्ठ भारतीय म्हणून निवड करण्यात आली होती.

अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठा मध्ये १९१६ साली डॉ. ए. ए. गोल्डनविझर यांनी मानववंशशास्त्र विषयक परिसंवादात भाग घेण्यासाठी भिमराव आंबेडकरांना बोलावण्यात आले त्यांनी भारतातील जाती त्यांचा उगम, विकास आणि वास्तविकता या विषयावर व्याख्यान दिले. तेव्हा आंबेडकर केवळ २५ वर्षांचे होते.

जाती संस्था मनुने निर्माण केली हे आंबेडकरांना मान्य नोव्हते डॉ. आबेडकरांच्या मतानूसार मनुने जातीचा कायदा सागितला नाही. तो ते करू शकत नव्हता मनून पूर्वी कित्येक वर्षे जातीसंस्था अस्तीत्वात होत्या स्मृतिकार मनुने अस्तित्वात असलेल्या कायद्याची संहिता बनून त्याला तात्वीक आणि धार्मीक अधिष्ठान प्राप्त करून दिले.

४ जानेवार १९२८ टाइम्स ऑफ इंडियात इंदूर संस्थानात अनूसुचित जातीना मिळणाऱ्या वाईट वागणुकी बदलाच्या वृत्ताची तुलना डॉ. आंबेडकरांनी अठराव्या शतकातील पेशवाईतील रिजनाच्या स्थितीशी केली. डॉ. आंबेडकरांनी जात या संकल्पनेची चिकीत्सा करून तीचा शोध घेण्याचा प्रयत्न केला.

बाबासाहेबांनीGoverment of India ॲक्ट १९१९ बाबत साऊथबरो कमिटी समोर आपले विचार मांडले. त्यावेळी त्यांनी दलित व इतर मागासलेल्या सांठी मतदान विभाग व आरक्षण यांची मागणी केली १९२० साली त्यांनी मुबांईत मुकनायक नावाचे वृत्तपत्र सुरू केले.. त्यावेळी शाहू महाराजांनी त्यांना २००० हजार रूपायांची मदत केली होती. आंबेडकरांनी मागावर्गीयाच्या उत्थानासाठी बहिष्कृत हितकारीणी सभा सुरू केली.

इ.स.१९२५ साली डॉ. आंबेडकर मुंबई प्रातीक विधानपरिषदेचे नेमलेले सदस्य बनले १९२७ च्या सुमारास त्यांनी अस्पृश्यते विरूध्द जागृत चळवळ सुरू करण्याचा निर्णय घेतला. त्यांनी पिण्याच्या पाण्यासाठी व हिंदू मंदीरात प्रवेशा साठी चळवळी व मोर्चा काढण्यास सुरूवात केली. सम्पूर्ण देशात बहूसंख्य ठिकाणी अस्पृश्यांना सार्वजनिक पाणवठयावर पाणी भरण्याचा किंवा पिण्याचा अधिकार नव्हता. ४ ऑगस्ट १९१३ रोजी ब्राम्हणेतर पक्षाचे नेते सी.के. बोले यांनी मुंबई प्रांत्याच्या विधीमंडलात एक ठराव पास करून घेतला. २० जूलै १९२४ रोजी मुंबई येथे बहीष्कृत हितकारीनी सभेची स्थापना केली. सामाजिक व राजकिय दृष्टया तळागाळात फेकल्या गेलेल्या भारतीय समाजातील इतरांच्या बरोबरीने आणणे हे या सभेचे ध्येय होते. अस्पृश्यांना समाजा बाहेर ठेवून त्यांना नागरी, धार्मिक व राजकीय हक्क देण्यात आले नोव्हते. त्यांच्या अधिकारी प्रती त्यांच्या मध्ये जागृती करणे हा उदेश होता. डॉ. आंबेडकरांनी कृषी व शेतकऱ्यांसाठी कार्य केले. स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली स्त्री यांसाठी कार्य केले. शैक्षणिक कार्य केले. काळाराम मंदीर सत्याग्रह केला. अबांदेवी मंदीर सत्याग्रह, मनूस्मृतीचे दहन त्यांचे अमूल्य योगदान राहीले आहे.

२१ व्या शतकात देशाच्या विकासाच्या दिशेने जावयाचे असेल तर डॉ. बाबासाहेब आंबेडकराच्या विचारा शिवाय पर्याय नाही असे ही म्हणता येईल

संदर्भ :—

१) गायकवाड राजवंश, ऑगस्ट २०१६ सहावी आवृत्ती महामानव डॉ. भिमरावजी आंबेडकर कोल्हापूर रिया प्रकाशन पेज. ३४—३५
२) आंबवडे नाव योग्यच — खासदार अमर साबळे लोकसत्ता १४.०४.२०१६,१४.०३.२०१८
३) कीर धनंजय, प्रथमावृत्ती १४ एप्रील १९६६ पापूलर प्रकाशन मूबंई पेज नं. ६०—,६२
४) राणे दिनेश युगप्रवर्तक डॉ. बाबासाहेब आंबेडकर ज्ञानगंगा ॲन्ड पब्लीकेशन पेज. नं. ७—८
५) लोकमत १४.०४.२०१७
६) दैनिक भास्कर ०९.०४.२०२०



“बुद्धिमत्तेचा विकास हे
मानवी अस्तित्वाचे
अंतिम लक्ष्य असले
पाहिजे.”


Aadhar Publications For Details www.aadharsocial.com
New Hanuman Nagar, In Front Of
Pathyapustak Mandal, Behind V.M.V. College, Amravati ( M.S ) India Pin- 444604
, Mob-- 9595560278, Emial: aadharpublication@gmail.com
issn 2278-9308